Maratha Vidya Prasarak Samaj's

**Arts, Science & Commerce College, Ozar (Mig)**

Tilak Nagar, Ozar (Mig), Tal. Niphad, Dist. Nashik (Maharashtra) 422 206.

Ph. : (02550) 275219, 275919

E-mail : ozarcollege@gmail.com Website : www.ozarcollege.com

- Affilliated to Savitribai Phule Pune University (ID No PU/NS/ASC/027/1984)
- Junior Vocational College Code : J 13.08.907
- Junior College Code : J 13.08.016
- HTE Sevarth ID : 06220100122_AST (College Code : 023)
- AISHE ID : C-41965

Ref.No. : Date :

**7.1.9 Sensitization of students and employees of the Institution to the constitutional obligations: values, rights, duties and responsibilities of citizens**

- We believe in giving holistic all-round education to the students. And sensitizing students on our constitutional rights, values, duties and responsibilities is one of the primary goal which is accomplished by the institute through various means.
- The institution sensitizes the students and the employees to the constitutional obligations about values, rights, duties and responsibilities and constantly works upon to nurture them as better citizens of the country through various curricular and extra-curricular activities.
- The institute hoists the flag during national festivals and invites eminent persons to inspire students and staff by informing the qualities of freedom fighters and to emphasize the duties and responsibilities of citizens. The college establishes policies that reflect core values. Code of conduct is prepared for students and staff and everyone should obey the conduct rules. The institution encourages participation of students in Sports and Games, NCC and NSS at National level to strengthen nationwide bond and relation.
- Various departments of the institution and NSS unit are actively involved in conducting several activities for inculcating values for being responsible citizens.
- **Voter's awareness program**, Mindful leadership camp, financial awareness interactive session, Extension / community outreach programme to make students responsible citizens.
- **Constitutional Obligations:** Institution has organized student centric activities like paper, poster & essay competition which have always received huge participation from the students and promoted their awareness about various aspects of Indian citizenship. The institution takes the pride of serving the opportunity for the students in conducting the Internship program.
- Our University has introduced a **Compulsory Course for FY on Democracy, Election and Governance**. The students become aware of their rights, values and responsibilities. They are made the responsible countries of the country.

**To sensitise our college conduct programme like:**

- Road Saftey Campaign,
- Swachha Bharat Abhiyan,
- Sadbhavana Divas
- Lokshahi Pandharwada
- National Voter Day
- Shivswarajya Din

Co-ordinator
Internal Quality Assurance Cell
Arts,Science and Commerce College
Ozar(Mig),Dist.Nasik-422 206

PRINCIPAL
Arts,Science and Commerce College
Ojhar(Mig),Dist.Nasik-422 206

**मराठा विद्या प्रसारक समाजाचे**

**कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय ओझर (मिग )**

**ता.निफाड जि. नाशिक**

## महाराष्ट्र शासन शिक्षण सहसंचालक आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

## निर्देशीत,

## कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, ओझर (मिग ) ता. निफाड राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## “२६ नोव्हेंबर संविधान दिन "

## दि:- " २६ नोव्हेंबर 2022 (2022-23)

महाराष्ट्र शासन शिक्षण सहसंचालक आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ निर्देशीत, म. वि. प्र. समाजाचे कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, ओझर (मिग) ता. निफाड, विद्यार्थी विकास मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "२६ नोव्हेंबर संविधान दिन "शनिवार 2022 रोजी सकाळी १०. ०० वाजता महाविद्यालयच्या सेमिनार हॉल मध्ये संपन्न झाला.आज भारतीय संविधानाचा स्वीकृती दिवस साजरा करण्यात आला याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. दरेकर सर यांनी आपल्या मनोगत भारतीय संविधान निर्मात्यांनी अतिशय खडतर आणि तितकेच अभ्यास पद्धतीने भारताला प्रदान केल्यामुळे भारत जगातील सर्वात मोठा

लोकशाही देश म्हणून ओळखला जात आहेत यामध्ये संविधानाचा सर्वात जास्त वाटा आहे. भारतीय संविधान हे निर्माण केलेले जनतेच्या हितासाठी आणि सदैव कल्याणासाठी असल्यामुळे ते कायमस्वरूपी चिरतरुण असल्याचे दिसत आहे संविधानाच्या निर्मितीमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अवर्णनीय आहे. म्हणून आजचा दिवस हा त्यांच्या आठवणीचा देखील आहे त्याचबरोबर संविधान समितीतील इतर सदस्यांनी केलेल्या कार्याची देखील आठवण आपल्याला ठेवावी लागेल. भारतीय संविधान हे आजपर्यंत कोणत्याही जातीच्या, धर्माच्या ,वंशाच्या, वर्णाच्या व्यक्तीला किंवा समूहाला  ते परके वाटले नाही यातच संविधानाचे मोठेपण भरले आहे. म्हणून त्याचे पालन करणे आपले सर्वांचे कर्तव्य असल्याचे मत प्राचार्य डॉ. दरेकर सर यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. प्राचार्य डॉ. आर. डी. दरेकर सर  यांनी संविधानाच्या प्रस्ताविकाचे आणि उद्देशिकाचे वाचन करून सर्वांना प्रतिज्ञा दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या शुभहस्ते  डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या मसुदा समितीच्या स्वीकृतीच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. प्रसंगी कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक कॅप्टन डॉ. दत्ता गोडगे यांनी केले तर या कार्यक्रमाचे आभार एन, एस, एस. कार्यक्रम अधिकारी डॉ.ज्ञानेश्वर एस. बोराडे यांनी मांडले. याप्रसंगी डॉ. आवारी, डॉ. नारायण पाटील, डॉ. रमाकांत पाटील, डॉ. वाय. पी. जाधव, प्रा. विजय पवार, प्रा. प्रवीण शिंदे, प्रा हेमंत गायकर, प्रा. श्रीमती आशा लांडगे, प्रा. ठाकरे तसेच ज्युनिअर आणि सिनिअर कॉलेज आणि होकेशनल  विभागाचे सर्व प्राध्यापक बंधू भगिनी आणि कार्यालयीन कर्मचारी, एन, एस, एस. स्वयंसेवक, राष्ट्रीय छात्र सेना कॅडेट्स, 252 विद्यार्थी उपस्थित होते.




GPS Map
Camera Lite
3WH8+R65, Samarth Nagar, Makhmalabad, Nashik, Maharashtra 422206, India
Latitude
20.0788535°
Longitude
73.9175227°
Local 10:10:27 AM
GMT 04:40:27 AM
Altitude 15.04 meters
Saturday, 26.11.2022


GPS Map
Camera Lite
Vijay Nagar Colony Rd, Ojhar, Maharashtra 422207, India
Latitude
20.080722°
Longitude
73.915958°
Local 10:11:16 AM
GMT 04:41:16 AM
Altitude 15.04 meters
Saturday, 26.11.2022


GPS Map
Camera Lite
3WH8+R65, Samarth Nagar, Makhmalabad, Nashik, Maharashtra 422206, India
Latitude
20.0788539°
Longitude
73.917522°
Local 10:10:58 AM
GMT 04:40:58 AM
Altitude 15.04 meters
Saturday, 26.11.2022

**मराठा विद्या प्रसारक समाजाचे**


# कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय ओझर (मिग)

## ता. निफाड जि. नाशिक

## राष्ट्रीय मतदार दिन अहवाल

मराठा विद्या प्रसारक समाजाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय ओझर (मिग) येथे 25 जानेवारी 2023 रोजी राज्यशास्त्र विभाग, विद्यार्थी विकास मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य डॉ. आर. डी. दरेकर यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. प्रमुख वक्ते किरणजी देशमुख उपस्थित होते. ते म्हणाले की, लोकशाहीच्या रक्षणासाठी आणि जागरूक राहण्यासाठी या दिवशी मतदारांना मतदानाची शपथ दिली जाते. सार्वत्रिक निवडणुकीनंतरचा हा लोकशाहीचा सर्वात मोठा सण आहे. मतदान करणे हा प्रत्येक जबाबदार नागरिकाचा हक्क आणि कर्तव्य आहे. तरुणांनी मतदानाबाबत जागरूक असणे गरजेचे आहे .भारतात दरवर्षी निवडणूक आयोगाच्या स्थापनेच्या दिवशी राष्ट्रीय राष्ट्रीय मतदार दिन साजरा केला जातो. प्रत्येक नागरिकाचे मत नवा भारत घडू शकते. त्यामुळे प्रत्येकाने मतदान करणे हे गरजेचे आहे. भारताची प्रगती आणि विकास हे मतदारांच्या मताने ठरविले जाते. देशाचा जबाबदार नागरिक म्हणून प्रत्येकाने मतदान केले पाहिजे. जगातील सर्वात मोठी लोकशाही अशी ओळख असलेल्या भारताची लोकशाही व्यवस्था टिकवण्यासाठी मतदान कसं महत्त्वाचं आहे हे या दिनाच्या निमित्ताने सांगितले जाते. नागरिकांनी आपल्या मताचा योग्य प्रकारे वापर केला तर योग्य प्रतिनिधी निवडून जाऊ शकतात. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य यांनी मतदान किती महत्वाचे आहे आणि आपल्या गावातील लोकांचे मतदान यातीत नावे कशी समाविष्ट करता येतील याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर उपस्थित विद्यार्थ्यांना मतदानाची शपथ देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. डी. येस. गोडगे यांनी केले तर प्रमुख पाहुणे यांचा परिचय प्रा. पि. के. शिंदे यांनी करून दिला आणि आभार प्रा. एम. बी. ठाकरे यांनी मांडले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. पि. आर. भदाणे महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.






मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

# कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय ओझर (मिग ), नाशिक

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ

## लोकशाही पंधरवडा कार्यक्रम अहवाल

दि. २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०२३

मराठा विद्या प्रसारक समाजाचे,कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय ओझर(मिग )महाविद्यालयात दि. २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०२३ दरम्यान विद्यार्थी विकास मंडळ व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उदघाटन २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने मा. प्राचार्य डॉ. आरदरेकर यांच्या .डी . प्रमुख वक्ते किरणजी देशमुख उपस्थित होते .अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. या निमित्ताने लोकशाही, संविधान व मतदानाचे महत्त्व याबाबत माहित्ती देण्यात आली. तसेच या निमित्ताने मतदान जनजागृतीचे पोस्टर प्रदर्शन भरवण्यात आले होते. तसेच ऑनलाईन प्रश्न मंजुषा घेण्यात आली जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये याची जनजागृती होईल. डॉ. डी. एस.गोडगे राज्यशास्त्र विभाग यांनी भारतीय मतदारांमध्ये आपले हक्क व कर्तव्य याबद्दल जागृकता निर्माण व्हावी याबाबत माहित्ते देत ७३ वा ७४ व्या घटना दुरुस्ती बाबत माहिती दिली. १ फेब्रु. ते ९ फेब्रु. दरम्यान Facebook, WhatsApp च्या माध्यमातून लोकशाही, निवडणूक व सुशासन याबाबतची माहिती विद्यार्थी, प्राध्यापक यांच्यापर्यंत पोहोचवण्यात आली. या कार्यक्रमाचे नियोजन प्रा. कमलाकर चव्हाण विद्यार्थी विकास अधिकारी, रासेयो अधिकारी डॉ. डी. एस. बोराडे व डॉ. डी. एस.गोडगे राज्यशास्त्र विभाग यांनी केले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे योगदान लाभले.









**मराठा विद्या प्रसारक समाजाचे**

## कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय ओझर (मिग )

**ता.निफाड जि. नाशिक**

## शिवस्वराज्य दिन अहवाल

मध्ययुगीन काळात साडेतीनशे वर्ष परकीय राजवटीनंतर छत्रपती शिवरायांनी निर्माण केलेले स्वराज्य हे रयतेचे राज्य होते बहुजन समाजाची एकत्र मोट बांधून उभे केलेले हे स्वराज्य म्हणजे लोकशाही राज्याची नांदी होती असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी प्रा संदीप जगताप यांनी ओझर महाविद्यालयात केले. महाविद्यालयात महाराष्ट्र शासन उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग निर्देशित शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शिवस्वराज्य दिन हा विशेष कार्यक्रम संपन्न झाला त्याप्रसंगी प्रा जगताप बोलत होते अध्यक्षस्थानी मराठा विद्या प्रसारक संस्थेचे सभापती श्री माणिकराव बोरस्ते होते कार्यक्रमात प्रथम छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केला यावेळी प्राचार्य डॉ एस एस काळे , उपप्राचार्य प्रा युवराज जाधव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा डॉ ज्ञानेश्वर बोराडे, प्राध्यापक प्रतिनिधी प्रा नारायण पाटील, कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख आशा लांडगे, अंतर्गत गुणवत्ता हमी प्रमुख प्रा आनंद म्हसदे प्रा पी आर भदाणे आदी मान्यवर उपस्थित होते प्रास्ताविक प्रा.नारायण पाटील यांनी केले .यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री माणिकराव बोरस्ते यांच्या हस्ते कवी संदीप जगताप यांचा सत्कार करण्यात आला. कुमारी प्रियंका गायकवाड या विद्यार्थिनीने आपल्या पहाडी आवाजात छत्रपतींचा पोवाडा सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले अध्यक्षीय मनोगतात श्री माणिकतात्या बोरस्ते यांनी इतिहास आणि समाज यांचा मागोवा घेऊन युवकांनी देश आणि समाजाची सेवा करण्यासाठी कटिबद्ध व्हावे असे प्रतिपादन केले .प्राचार्य डॉ एस एस काळे यांनी आपल्या मनोगतात शिवराज्याभिषेक दिना ची पार्श्वभूमी सांगून महाविद्यालयातील विविध उपक्रमांचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे प्रतिपादन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी प्रतीक्षा जाधव यांनी केले तर गायत्री पगार यांनी आभार

मानले. शिवस्वराज्य दिन कार्यक्रमाचे कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थी अतिशय उत्साहात सहभागी झाले.












**मराठा विद्या प्रसारक समाजाचे,**

## कला,विज्ञान व  वाणिज्य महाविद्यालय ओझर (मिग ), नाशिक

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ**

## अल्प संख्यांक हक्क दिवस निमित्त उपक्रम अहवाल

## १८ डिसेंबर २०२२

मराठा विद्या प्रसारक समाजाचे कला, विज्ञान व  वाणिज्य महाविद्यालय ओझर (मिग )आणि विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत अल्प संख्यांक हक्क दिवस निमित्ताने महाविद्यालयात उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. डी. दरेकर अध्यक्षस्थानी होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी प्रामुख्याने प्रत्येक मुलांमध्ये याबाबत जागरूकता कशी निर्माण होईल आणि या दिवसाचे महत्व आपल्या भाषणातून सांगितले. या उपक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. कमलाकर चव्हाण यांनी केले . सूत्रसंचालन डॉ. एम.डी. ढिकले तर डॉ. डी. एस. बोराडे यांनी आभार मानले. या उपक्रमासाठी  विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.





# सर्वोच्च नेतृत्व महिलांकडे हीच लोकशाहीची ताकद

## किरण देशमुख : मतदार दिवस साजरा




ओझर येथील महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना मुख्याधिकारी किरण देशमुख. समवेत प्राचार्य आर. डी. दरेकर, डॉ. डी. एस. गोडगे, प्रा. प्रवीण शिंदे, प्रा. कमलाकर चव्हाण, प्रा. एम. बी. ठाकरे.

लोकमत

**ओझर टाउनशिप** : स्व. पंतप्रधान राजीव गांधी यांच्या कार्यकाळामध्ये ६१ वी घटना दुरुस्ती करून मतदाराचे वय १८ वर्षे करण्यात आले. भारतीय राज्य घटनेने नागरिकांना हक्क व कर्तव्य दिलेले आहेत. प्रत्येक व्यक्तीने मतदानाचे कर्तव्य कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता पार पाडले पाहिजे. द्रौपदी मुर्मू यांच्यासारख्या सामान्य कुटुंबातील आदिवासी महिला देशाच्या सर्वोच्च पदावर विराजमान होऊ शकतात, हिच देशाच्या संविधानाची आणि सामान्य माणसांची ताकद असल्याचे प्रतिपादन ओझर नगर परिषदेचे मुख्याधिकारी किरण देशमुख यांनी केले.

मविप्र संस्थेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी मुख्याधिकारी देशमुख बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. डी. दरेकर होते. राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. डी. एस. गोडगे यांनी प्रास्तविकात राष्ट्रीय मतदार दिनाचे औचित्य स्पष्ट केले. प्राचार्य डॉ. दरेकर यांनी लोकशाही यशस्वी करण्यासाठी सामान्य जनता व बुद्धिवादी वर्ग यांचा सहभाग महत्त्वाचा असतो, असे सांगून सध्या राजकीय तत्त्वांचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात होत चालल्याबद्दल खंतही व्यक्त केली. यावेळी त्यांनी विद्यार्थी आणि प्राध्यापकांना मतदानाची शपथ दिली. परिचय प्रा. प्रवीण शिंदे यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. कमलाकर चव्हाण यांनी तर प्रा. एम. बी. ठाकरे यांनी आभार मानले.

सकाळ

नाशिक, सोमवार,
१४ नोव्हेंबर २०२२



**ओझर : समाजशास्त्र मंडळाच्या उद्‍घाटनप्रसंगी बोलताना डॉक्टर नितीन जाधव. शेजारी डॉ. आर. डी. देरेकर, डॉ. डी. एस. गोडगे, पी. के. शिंदे.**

# समाजशास्त्र मंडळाचे उद्‍घाटन

**ओझर :** मानवाच्या व्यवहाराचा सामाजिक पातळीवर समाजशास्त्रात अभ्यास होत असला तरी तो अभ्यास काळानुरूप बदलत जातो. हक्क आणि स्वार्थ एकत्र आले, की आपण मूळ संकल्पनापासून दूर जातो. राज्यघटनेने आपल्याला जे मूलभूत हक्क दिले आहेत ते योग्य पद्धतीने विकासप्रक्रियेत आणणे गरजेचे आहेत. समता आणि स्वातंत्र्य या दोन्ही तत्त्वांचा स्वीकार व्यक्तीला एकाच वेळी करता येत नाही; मात्र आपल्या राज्यघटने यांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो, असे प्रतिपादन ओझर येथील मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात झालेल्या समाजशास्त्र मंडळाच्या उद्‍घाटनप्रसंगी डॉक्टर नितीन जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. औपचारिक शिक्षणाबरोबरच इतरही बाबींचे ज्ञान विद्यार्थ्यांना व्हावे, या उद्देशाने महाविद्यालयात अनेक मंडळे स्थापन केली जातात. त्यात आजचा विद्यार्थी आपल्या हक्कांबाबत सजग आहे का? त्याला सहज करणे हेच आपल्या शिक्षणाचे खरे काम आहे. त्याचप्रमाणे समाजात असणारे कितीतरी प्रश्न आज शिक्षणातून निर्माण झालेले आहेत. शिक्षणातून सजगता निर्माण होण्याची जबाबदारी शिक्षणव्यवस्थेवर आहे, असे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष माननीय प्राचार्य डॉक्टर आर. डी. देरेकर यांनी केले. व्यासपीठावर आर. डी. देरेकर, डॉक्टर नितीन जाधव, राष्ट्रीय छात्रसेना आणि राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉक्टर डी. एस. गोडगे, अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षाचे समन्वय प्राध्यापक मस्के, समाजशास्त्र मंडळ समन्वय पी. के. शिंदे उपस्थित होते. याशिवाय महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ स्तरावरील विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. डॉ. डी. एस. गोडगे यांनी प्रस्ताविक केले. प्राध्यापिका एस. बी. काढणार यांनी सूत्रसंचालन केले. पी. ए. पगारे यांनी आभार मानले.